# वानिकी आधारित शेती पद्धती अंतर्गत बांबू लागवड

**(घटक अ २ (२) ( i ) )**

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून,भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भूभाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू वृक्ष लागवड या घटकास प्राधान्य दिले आहे. बांबू हे उत्कृष्ट नुतनीकृत जैव इंधन संसाधन,लाकूड आणि कागद याकरिता उपयुक्त मानले जाते. प्रकल्पांतर्गत बांबू लागवड केल्यास,बांबू आधारित इतर छोटे उद्योग उभारणी करून शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास हातभार लागेल.

**उद्दिष्टे:**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गावसमुहात वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड या घटकाचे उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. वातावरणातील कार्बन उत्सर्जनामुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी वृक्ष आच्छादन वाढवणे, जमिनीतील सेंद्रिय घटकांचे संवर्धन,पीक आणि पीक पद्धतीतून उत्पादकता वाढविणे.
२. जमिनीची धूप थांबविणे व जमिनीचा कस वाढविणे.
३. शेतीपिकांना पूरक म्हणून बांबू लागवडीखालील क्षेत्र वाढविणे.
४. शेतीपद्धतीवर आधारित बांबू लागवडीखालील क्षेत्रात वाढ करून एकमेकांना पूरक व एकात्मिक पद्धतीने पिकांची उत्पादकता वाढविणे,रोजगाराच्या संधी, उत्पन्नाच्या संधी व ग्रामीण भागातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारणे यासाठी प्रोत्साहन देणे.
५. विविध कृषी पर्यावरणीय प्रदेश आणि जमीन वापराच्या परिस्थितीनुसार बांबूसाठी अनुकूल पद्धती /आदर्श पद्धती लोकप्रिय करणे.
६. शेतीपद्धतीवर आधारित बांबू लागवड क्षेत्राचा विस्तार व क्षमता बांधणीसाठी सहाय्य करणे.

## अ. खाजगी क्षेत्रावर (वैयक्तिक लाभ) वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड

शेतकऱ्यांच्या वैयक्तिक क्षेत्रावर वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड करणे अभिप्रेत आहे. यामध्ये लाभार्थीच्या शेतात,शेताच्या बांधावर, वैयक्तिक/सामुदायिक शेततळयाच्या बांधावर बांबू लागवडीस प्रोत्साहन दिले जाईल.

या घटकांतर्गत खालील बाबींचा समावेश आहे.

१. **परिघीय क्षेत्र / बांधावरील लागवड:** शेतकऱ्यांच्या शेतावरील परिघीय क्षेत्राचा व बांधाचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा, यासाठी परिघीय क्षेत्रावर तसेच बांधावर बांबूची लागवड करता येईल. यामध्ये ५ मी. अंतरावर

वृक्षारोपणासाठी प्रती रोप अर्थसहाय्य देण्यात येईल. यामुळे शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्नाच्या संधी निर्माण करण्यास तसेच बांधबंदिस्तीसाठी व जमिनीची धूप कमी करण्यास मदत होईल.

परिघीय सीमा बांबू वृक्षारोपण अंतर्गत तीन वर्षांच्या कालावधीसाठी देखरेखीच्या तरतुदीसह नांग्या भरणे या बाबींचा समावेश आहे. वृक्षारोपण झालेल्या क्षेत्राचे मोजमाप / मूल्यमापन प्रति मीटर लागवड केलेल्या रोपे संख्या वरून केले जाईल.

२. **जास्त घनतेची लागवड करणे:** शेतकऱ्यांच्या शेतावर मध्यवर्ती ब्लॉक लागवड/पट्ट्यामधील लागवड/वाऱ्याचा जोर कमी करणाऱ्या रोपांची जास्त घनतेची लागवड करता येईल. यामध्ये प्रति हेक्टर जास्तीत जास्त ४०० रोपे या प्रमाणात वृक्षारोपणासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. उपलब्ध जमिनीचा जास्तीत जास्त वापर होण्याच्या दृष्टीने पीक उत्पादनासाठी अयोग्य व पडीक जमिनीचा उपयोग यामध्ये करता येईल. ब्लॉक लागवड अंतर्गत प्रत्येक ब्लॉकमध्ये जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रापर्यंत वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड मध्ये समाविष्ट प्रजातींचा खालीलप्रमाणे वेगवेगळ्या अंतरावर लागवडीसाठी या योजनेमधून प्रोत्साहन दिले जाईल.

| अ.न. | लागवडीचे अंतर ,मी . | हेक्टरी रोपांची संख्या |
|---|---|---|
| १ | ५ x ५ मी | ४०० |
| २ | ६ x ६ मी | २८० |

➢ **<u>लाभार्थी निवडीचे निकष -</u>**

१. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी (एकूण भूधारणा २.०० हे.पर्यंत) या घटकासाठी पात्र राहतील.

२. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषी संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना,अनु.जाती/जमाती,महिला,दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.

३. जास्तीत जास्त २ हे.क्षेत्र लागवडीसाठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

➢ **<u>अर्थसहाय्य:</u>**

वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड या घटकांतर्गत परिघीय क्षेत्र/बांधावरील प्रती रोप लागवडीसाठी रक्कम रुपये २४०/- हा आर्थिक मापदंड आहे.

| अ.न. | घटक /बाब | प्रती रोप अंदाजे खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | रोपाची किंमत (वाहतूक खर्चासहित ) | ३०.०० |
| २ | खड्डा खोदणे (०.३० x.०.३० x०.३० मी.) | १५.०० |
| ३ | खत टाकून रोप लावणे (१ घमेले कुजलेले शेणखत व २०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्पेट ) | १५.०० |
| ४ | निंदनी व डवरणी | ३०.०० |
| ५ | सिंचन करणे | ७०.०० |
| ६ | कुंपण करणे व सुरक्षेचे काम | ६५.०० |
| ७ | खताची किंमत | १५.०० |
| | **एकूण खर्च** | **२४०.००** |

उपरोक्त नमूद बाबनिहाय खर्च हा अंदाजित असून सदर बाबींवर होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चानुसार कमाल रु.२४० प्रती रोप खर्च मर्यादा राहील.

**अनुदान मर्यादा -**

प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाकरिता बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या **५० टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु. १२०/- प्रती रोप** अनुदान शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या एकूण लागवडीच्या खर्चाप्रमाणे देय राहील.

**जास्त घनतेच्या ब्लॉक वृक्षारोपण अंतर्गत बांबूचे आर्थीक मापदंड:**

| अ.क्र. | ब्लॉक वृक्षारोपण (प्रति हेक्टर कलमे संख्या) | एकूण खर्च (प्रति हेक्टर),रुपये | देय अनुदान ५० % (प्रती हेक्टर),जास्तीत जास्त रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | २८० ( अंतर ६ x ६ मी.) | ६७२०० | ३३,६०० |
| २ | ४०० ( अंतर ५ x ५ मी.) | ९६००० | ४८,००० |

**टिप:** प्रत्येक ब्लॉकमधील बांबू वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना वर दर्शविल्यानुसार करण्यात येईल.

(**संदर्भ:** राष्ट्रीय बांबू अभियान मार्गदर्शक सूचना)

१. प्रकल्पांतर्गत बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या ५० टक्के देय अनुदान रक्कम शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या एकूण लागवडीच्या खर्चाप्रमाणे देय राहील. सदर देय अनुदान तीन वर्षांसाठी वर्षनिहाय ५०:३०: २० या प्रमाणत अदा करण्यात येईल.

२. जे लाभार्थी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी कमीत कमी अनुक्रमे ८०% व १००% झाडे जिवंत ठेवतील त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या व तिस-या वर्षाचे अनुदान देय राहील.

३. लाभार्थ्यांकडे लागवड केलेल्या रोपांची मर झाल्यास लाभार्थ्याने रोखीने रोपे विकत घेऊन विहित प्रमाणात जिवंत झाडांची टक्केवारी राखावी लागेल.

➢ **<u>अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या</u>**

**लाभार्थी**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व अर्ज करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

२. पूर्व संमती प्राप्त झाल्यावर विहीत वेळेत काम सुरु करावे .

३. सदर घटकाचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्याने जमीन आरोग्य पत्रिका काढावी.

४. संबंधित कृषी सहाय्यकाच्या मार्गदर्शनानुसार शासकीय अथवा शासनाची मंजुरी असलेल्या किसान रोपवाटिकेतून बांबू रोपे घ्यावीत.

५. कृषी सहाय्यकामार्फत नियोजित प्रकल्प क्षेत्राची पाहणी करून शिफारस केल्यानंतर व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दिल्यावर लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष रोपांची लागवड करावी. देय अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी करावी व रोपे खरेदीची व इतर साहित्याची आवश्यक देयके संकेतस्थळावर अपलोड करावीत .

६. प्रकल्पांतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके सहभागी लाभार्थ्याने मान्य करावीत. प्रमाणापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी लाभार्थ्याने स्वतः घ्यावी. त्यासाठी आवश्यक असणारी खड्डे खोदणे, खत मिश्रणाने खड्डे भरणे, रोपांची वाहतूक करणे, त्यांची लागवड करणे, रोपांना कुंपण करणे व वेळोवेळी निंदणी करून पाणी देणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

**ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे ऑनलाईन अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करणे.
२. इच्छुक वैयक्तिक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज व कागदपत्रांची छाननी करून अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करणे व ते अपलोड करावे.
३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षणास संबधित कृषि सहाय्यक/ प्रकल्प यंत्रणा यांना मदत करणे.

**समूह सहाय्यक**

१. गावसमूहातील इच्छुक लाभार्थींना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. इच्छुक लाभार्थ्यांनी अपलोड केलेल्या आवश्यक कागदपत्रांची छाननी करणे.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. लाभार्थ्यास वानिकी आधारित शेतीपद्धती बांबू वृक्ष लागवड या घटकाच्या अटी, शर्ती व तांत्रिक/आर्थिक निकष समजावून सांगणे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज व सोबत अपलोड केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छाननी आधारे पात्र अर्जाच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी तपासणी सूचीनुसार करून प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
३. अर्जदाराने यापूर्वी या घटकाचा इतर अथवा या योजनेतून लाभ घेतला असल्यास त्याचा तपशील आपल्या स्थळाची पाहणी तपासणी अहवालात देणे.
४. योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार वैयक्तिक लाभ देण्याकरिता विहित नमुन्यात अंदाजपत्रक तयार करणे.
५. तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेनंतर कृषि/सामाजिक वनीकरण विभागाच्या शासकीय किंवा किसान रोपवाटिकेतून नमूद केलेल्या रोपांचा प्रकार व संख्येनुसार शेतकऱ्यांना अवगत करणे. याचबरोबर व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र बांबू विकास मंडळ ,नागपूर यांचे कार्यालयास (दूरध्वनी क्रमांक- ०७१२-२५४२५९५) संपर्क करून रोपांच्या उपलब्धतेबाबत माहिती घेऊन त्याप्रमाणे शेतकऱ्यांना अवगत करणे.
६. कृषि सहाय्यक यांनी तांत्रीक मंजुरी प्राप्त करून घेऊनच प्रत्यक्ष लागवड हाती घेण्यात यावी. तांत्रिक मंजुरी शिवाय लागवड केलेले क्षेत्र अनुदानास पात्र ठरणार नाही,याची दक्षता घेणे.
७. लाभार्थ्यांनी लागवड पूर्ण करून संकेतस्थळावर अवगत केल्यानंतर मोका तपासणी करुन मापनपुस्तिकेत नोंद घेणे, प्रकल्पाच्या DBT App द्वारे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश/रेखांशसह भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
८. वैयक्तिक लाभार्थ्यांच्या अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.

९. वानिकी आधारित शेतीपद्धती- बांबू लागवड घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

**कृषि पर्यवेक्षक**

कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन शिफारस केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी २५% लाभार्थ्यांची बांबू लागवड तपासणी अनुदान अदायगी पूर्वी करावी व याबाबतच्या मापनपुस्तिकेतील नोंदींची खात्री करून प्रमाणित कराव्यात. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पर्यवेक्षीय तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे व तपासणी अहवाल सादर करावा.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांच्या छानन्नी नंतर पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबधित लाभार्थी यांना ऑनलाईन पूर्व समंती प्रदान करावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.
२. बांबू लागवडीच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देणे.
३. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र बांबू विकास मंडळ ,नागपूर यांचे कार्यालयास (दूरध्वनी क्रमांक- ०७१२-२५४२५९५) संपर्क करून बांबू रोपांच्या उपलब्धतेबाबत कृषि सहाय्यक यांना अवगत करणे.
४. तपासणी अहवालासह ऑनलाईन शिफारस झालेल्या योग्य प्रस्तावांची देय अनुदान अदायगी DBT प्रणालीद्वारे लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात वर्ग करण्यास मंजुरी द्यावी.
५. याद्दच्छिक (Random) पद्धतीने अनुदान अदायगी पूर्वी लाभार्थी संख्येच्या ५% तपासणी करणे.
६. लाभार्थ्यांना घटकासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे.
७. योजनेचे सनियंत्रण करणे.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची याद्दच्छिक (Random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या किमान १% तपासणी करावी व विहित नमुन्यातील पर्यवेक्षीय तपासणी अहवाल सादर करावा.

**प्रचार व प्रसिद्धी –**

या घटकास नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, कार्यमहिमा व मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

## ब .सार्वजनिक क्षेत्रावर ( ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्र )
## वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड

सार्वजनिक क्षेत्रावर (ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्र ) वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड करणे अभिप्रेत आहे. यामध्ये शासकीय पडीक जमीन,गायरान,गावठाण ई. क्षेत्रावर तसेच नाला काठ,सलग समतल चर व खोल समपातळी चरांच्या बांधावर बांबू लागवडीस प्रोत्साहन दिले जाईल.

या घटकांतर्गत खालील बाबींचा समावेश आहे.

१. **परिघीय क्षेत्र / बांधावरील लागवड:** सार्वजनिक क्षेत्रावरील परिघीय क्षेत्राचा व बांधाचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा यासाठी परिघीय क्षेत्रावर तसेच बांधावर बांबूची लागवड करता येईल. यामध्ये ५ मी. अंतरावर वृक्षारोपणासाठी प्रती रोप अर्थसहाय्य देण्यात येईल. यामुळे बांधबंदिस्तीसाठी व जमिनीची धूप कमी होण्यास मदत होईल.

परिघीय सीमा बांबू वृक्षारोपण अंतर्गत तीन वर्षांच्या कालावधीसाठी देखरेखीच्या तरतुदीसह नांग्या भरणे या बाबींचा समावेश आहे. वृक्षारोपण झालेल्या क्षेत्राचे मोजमाप / मूल्यमापन प्रति मीटर लागवड केलेल्या रोपे संख्या वरून केले जाईल.

२. **जास्त घनतेची लागवड करणे:** सार्वजनिक क्षेत्रावर मध्यवर्ती ब्लॉक लागवड/पट्ट्यामधील लागवड/ वाऱ्याचा जोर कमी करणाऱ्या रोपांची जास्त घनतेची लागवड करता येईल. यामध्ये प्रति हेक्टर जास्तीत जास्त ४०० रोपे या प्रमाणात वृक्षारोपणासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. ब्लॉक लागवड वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड मध्ये खालीलप्रमाणे वेगवेगळ्या अंतरावर लागवडीसाठी या योजनेमधून प्रोत्साहन दिले जाईल.

| अ.न. | लागवडीचे अंतर ,मी . | हेक्टरी रोपांची संख्या |
|---|---|---|
| १ | ५ x ५ मी | ४०० |
| २ | ६ x ६ मी | २८० |

- **अर्थसहाय्य:**

वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड या घटकांतर्गत परिघीय क्षेत्र/बांधावरील प्रती रोप लागवडीसाठी रक्कम रुपये २४०/- हा आर्थिक मापदंड आहे.

| अ.न. | घटक /बाब | प्रती रोप अंदाजे खर्च (रु.) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण खर्च |
| १ | रोपाची किंमत (वाहतूक खर्चासहित ) | ३०.०० | ० | ० | ३०.०० |
| २ | खड्डा खोदणे (०.३० x.०.३० x०.३० मी.) | १५.०० | ० | ० | १५.०० |
| ३ | खत टाकून रोप लावणे (१ घमेले कुजलेले शेणखत व २०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्पेट ) | १५.०० | ० | ० | १५.०० |
| ४ | निंदनी व डवरणी | १०.०० | १०.०० | १०.०० | ३०.०० |
| ५ | सिंचन करणे व नांग्या भरणे | ५०.०० | १०.०० | १०.०० | ७०.०० |
| ६ | कुंपण करणे व सुरक्षेचे काम | ५०.०० | ५.०० | १०.०० | ६५.०० |
| ७ | खताची किंमत | १०.०० | ५.०० | ० | १५.०० |
| | **एकूण खर्च** | **१८०.००** | **३०.००** | **३०.००** | **२४०.००** |

उपरोक्त नमूद बाबनिहाय खर्च हा अंदाजित असून सदर बाबींवर होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चानुसार कमाल रु.२४० प्रती रोप खर्च मर्यादा राहील.

**अनुदान मर्यादा –**

सार्वजनिक क्षेत्रावर (ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्रावर) वानिकी आधारित बांबू लागवड करण्यासाठी बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या **१०० टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु. २४०/- प्रती रोप** इतके अनुदान देय आहे.

**जास्त घनतेच्या ब्लॉक वृक्षारोपण अंतर्गत बांबूचे आर्थीक मापदंड:**

| अ.क्र. | ब्लॉक वृक्षारोपण (प्रति हेक्टर कलमे संख्या) | एकूण खर्च (प्रति हेक्टर ), रुपये | देय अनुदान (१०० %) प्रती हेक्टर,जास्तीत जास्त रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | २८० ( अंतर ६ x ६ | ६७२०० | ६७२०० |
| २ | ४०० ( अंतर ५ x ५ मी.) | ९६००० | ९६००० |

टिप: प्रत्येक ब्लॉकमधील बांबू वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना वर दर्शविल्यानुसार करण्यात येईल.

(**संदर्भ:** राष्ट्रीय बांबू अभियान मार्गदर्शक सूचना)

१. प्रकल्पांतर्गत बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या १०० टक्के देय अनुदान रक्कम सार्वजनिक क्षेत्रावर केलेल्या लागवडीच्या प्रमाणात देय राहील. सदर देय अनुदान तीन वर्षांसाठी वर्षनिहाय ५०:३०:२० या प्रमाणत अदा करण्यात येईल.

२. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी कमीत कमी अनुक्रमे ८०% व १००% झाडे जिवंत ठेवतील,त्या सार्वजनिक क्षेत्रास दुसऱ्या व तिस-या वर्षाचे अनुदान देय राहील.

➢ **<u>अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या</u>**

**ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)**

१. सार्वजनिक क्षेत्रावर (ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्रावर) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लागवडीयोग्य क्षेत्र निश्चित करण्याचा ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) ठराव करणे.

२. ज्या सार्वजनिक क्षेत्रावर लागवड करावयाची आहे, त्याबाबतचा आराखडा आणि विहित नमुन्यातील अंदाजपत्रक कृषि सहाय्यकामार्फत तयार करून घेणे.

३. सदर अंदाजपत्रकांना उपविभागीय कृषि अधिकारी यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त करून घेणे.

४. ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर परिपत्रक क्रमांक नादेकृसंप्र /प्रापण /प्र.क्र.१२४/२०१८,दिनांक ४/१०/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे गठीत केलेल्या खरेदी समितीमार्फत तांत्रिक मंजुरी मिळालेल्या अंदाजपत्रकानुसार आवश्यक निविष्ठा (आवश्यक खते ई.) खरेदी कराव्यात. -

| अ.क्र. | पदनाम | स्थान | निविदा स्वीकारणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | कृषि पर्यवेक्षक | अध्यक्ष | ग्राम कृषि संजीवनी समिती अध्यक्ष |
| २ | कृषि सहाय्यक | सदस्य सचिव | |
| ३ | समूह सहाय्यक | सदस्य | |
| ४ | ग्राम कृषि संजीवनी समितीचे तीन सदस्य (त्यापैकी एक महिला व एक अजा/अज प्रवर्गाचा सदस्य) | सदस्य | |

५. बांबू लागवडीच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार,आवश्यक रोपांची मागणी उपविभागीय कृषि अधिकारी यांना कळविणे.
६. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून आवश्यक रोपे खरेदीचे परमिट घेऊन ग्राम कृषि संजीवनी समितीने शासकीय अथवा शासनाची मंजुरी असलेल्या किसान रोपवाटिकेतून बांबू रोपे खरेदी करावीत.
८. खरेदी करण्यात आलेल्या बांबू रोपे, निविष्ठा (खते ) ई. ची नोंद साठा नोंदवही (स्टॉक रजिस्टर) मध्ये घेणे.
९. ग्राम कृषि संजीवनी समितीने मंजूर अंदाजपत्रकानुसार मजुराकरवी लागवडीसाठी जमीन तयार करणे,खड्डे खोदणे व प्रत्यक्ष लागवड करून घेणे .
१०. लागवडीनंतर रोपांना पाणी देणे, खते देणे, निंदनी, कुंपण ई. कामे मजुराकरवी करून घेणे.
११. सदर मजुरांची हजेरी पट नोंदविण्याची कार्यवाही समूह सहाय्यकामार्फत करून घेणे.
१२. लागवड पूर्ण झाल्यानंतर तसेच त्यानंतर उर्वरित कामे पूर्ण झाल्यावर त्या त्या वेळी कृषि सहाय्यकाकडून मोका तपासणी करून मापन पुस्तिकेत नोंद करून घेणे व उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे आवश्यक निधीची मागणी करणे.
१३. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून आवश्यक निधी समितीच्या खात्यामध्ये प्राप्त झाल्यानंतर त्या निधीतून रोपांची किंमत, निविष्ठा, लागवड व देखभालीसाठी लावलेल्या मजुरांची प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मोजमापाप्रमाणे मजुरीची रक्कम संबधितांच्या बँक खात्यामध्ये RTGS द्वारे वर्ग करणे.
१४. सार्वजनिक क्षेत्रावरील केलेल्या लागवडीची देखभाल करण्याची/विहित प्रमाणात झाडे जिवंत ठेवणे.
१५. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षणास संबधित कृषि सहाय्यक/ प्रकल्प यंत्रणा यांना मदत करणे.

**समूह सहाय्यक**

१. सार्वजनिक क्षेत्रावर बांबू लागवड करण्यासाठी आराखडा तयार करण्यास कृषि सहाय्यकास मदत करणे.
२. ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर गठीत केलेल्या खरेदी समितीचा सदस्य या पदाची जबाबदारी पार पाडणे.
३. सार्वजनिक क्षेत्रावर बांबू लागवडीकरिता लावण्यात आलेल्या मजुरांचा हजेरी पट ठेवणे.
४. मजुरांचा नोंदविलेला हजेरी पट कृषि सहाय्यकास सादर करणे.
५. मजुराद्वारे प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मोजमाप करण्यास कृषि सहाय्यकास मदत करणे.
६. बांबू वृक्ष लागवडीसाठी आवश्यक निविष्ठांची साठा नोंदवहीत वेळोवेळी नोंदी घेणे.

**कृषि सहाय्यक**

१. सार्वजनिक क्षेत्रावर बांबू लागवड करण्यासाठी आराखडा तयार करणे.
२. ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर गठीत केलेल्या खरेदी समितीचा सदस्य सचिव या पदाची जबाबदारी पार पाडणे.
३. योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार सार्वजनिक लाभ देण्याकरिता विहित नमुन्यात अंदाजपत्रक तयार करणे.
४. तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेनंतर कृषि/सामाजिक वनीकरण विभागाच्या शासकीय किंवा किसान रोपवाटिकेतून रोपे उपलब्ध होण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांकडे मागणी करणे.
५. उपविभागीय कृषि अधिका-याकडून परमिट प्राप्त झाल्यानंतर,संबधित रोपवाटिकेतून बांबू रोपे उपलब्ध करून घेणे व मजुराकरवी लागवडीची कार्यवाही करणेस समितीस मार्गदर्शन व सहकार्य करणे.
६. सार्वजनिक क्षेत्रावर झालेल्या लागवडीची मापन पुस्तिकेत नोंदी घेऊन आवश्यक निधीची ग्राम कृषि संजीवनी समितीच्या ठरावासह उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे वेळोवेळी मागणी करणे .

७. लागवड झालेल्या क्षेत्राच्या नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश/रेखांशसह भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) करणे.
८. उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून ग्राम कृषि संजीवनी समितीच्या खात्यावर मागणीप्रमाणे निधी प्राप्त झाल्यानंतर रोपांची रक्कम,निविष्ठांचा खर्च,मजुरीची रक्कम संबधितांच्या बँक खात्यावर RTGS द्वारे अदा करणेबाबतची कार्यवाही करणे.
९. वानिकी आधारित शेतीपद्धती- बांबू लागवड घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

**कृषि पर्यवेक्षक**

१. ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर गठीत केलेल्या खरेदी समितीचा अध्यक्ष या पदाची जबाबदारी पार पाडणे.
२. कृषि सहाय्यक यांनी शिफारस केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी सार्वजनिक क्षेत्रावर झालेल्या एकूण लागवडीच्या २५% तपासणी अनुदान अदायगी पूर्वी करावी व याबाबतच्या मापनपुस्तिकेतील नोंदींची खात्री करून प्रमाणित कराव्यात.
३. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पर्यवेक्षीय तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर ग्राम कृषि संजीवनी समितीच्या अध्यक्षाची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली त्यांचे नाव नमूद करावे व तपासणी अहवाल सादर करावा.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे ग्राम कृषि संजीवनी समितीस निधी वर्ग करण्यासाठी शिफारस करणे.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. सार्वजनिक क्षेत्रावरील बांबू लागवडीच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देणे.
२. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र बांबू विकास मंडळ ,नागपूर यांचे कार्यालयास (दूरध्वनी क्रमांक- ०७१२-२५४२५९५) संपर्क करून बांबू रोपांच्या उपलब्धतेबाबत कृषि सहाय्यक यांना अवगत करणे.
३. ग्राम कृषि संजीवनी समितीकडून मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे प्राप्त झालेल्या रोपांच्या मागणीनुसार रोपे उपलब्धतेचे परमिट देणे.
४. सार्वजनिक क्षेत्रावरील लागवडी करिता मापन पुस्तिके प्रमाणे आवश्यक निधी संबधित ग्राम कृषि संजीवनी समितीच्या मागणीप्रमाणे समितीस उपलब्ध करून देणे.
५. यादृच्छिक (Random) पद्धतीने अनुदान अदायगी पूर्वी सार्वजनिक क्षेत्रावर झालेल्या एकूण लागवडीच्या ५% तपासणी करणे.
६. योजनेचे सनियंत्रण करणे.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लागवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने सार्वजनिक क्षेत्रावरील लागवडीच्या किमान १% तपासणी करावी व विहित नमुन्यातील पर्यवेक्षीय तपासणी अहवाल सादर करावा.

**प्रपत्र -१**

**पर्यवेक्षीय तपासणी अहवाल (वैयक्तिक क्षेत्रावरील )**

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं<br>वर्गवारी: ____________ (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण)<br>मु.पो.<br>ता. उपविभाग<br>जि. |
| ६. | बाब | वानिकी आधारित शेतीपद्धती -बांबू लागवड अंतर्गत रोपे |
| ७ . | लागवडीचे वर्ष | |
| ८ . | लागवडीचे क्षेत्र (हे. आर.) | |
| ९ . | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. रोपांची एकूण संख्या ---------------<br>२. जिवंत रोपांची एकूण संख्या ----------<br>३. रोपांची सरासरी उंची --------------(सेंमी)<br>४. रोपामधील अंतर ------------------ (सेंमी) |

| | | |
|---|---|---|
| १०. | लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| ११. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १२. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १३. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |

| १४. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
|---|---|
| | |

तपासणी अधिकारी, श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी

(नाव....................)

# प्रपत्र -२

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल (सार्वजनिक क्षेत्रावरील )

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी | १.श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लागवडीचे ठिकाण | सर्वे नं<br>मु.पो.<br>ता. उपविभाग<br>जि. |
| ६. | बाब | वानिकी आधारित शेतीपद्धती -बांबू लागवड अंतर्गत रोपे |
| ७. | लागवडीचे वर्ष | |
| ८. | लागवडीचे क्षेत्र (हे. आर.) | |
| ९. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. रोपांची एकूण संख्या ---------------<br>२. जिवंत रोपांची एकूण संख्या ----------<br>३. रोपांची सरासरी उंची --------------(सेंमी)<br>४. रोपामधील अंतर ------------------ (सेंमी) |
| १०. | सार्वजनिक क्षेत्रावर लागवडीसाठी देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| ११. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १२. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १३. | ग्राम कृषि संजीवनी समिती अध्यक्षांचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |

| १४. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
|---|---|
| | |

तपासणी अधिकारी, श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.

पदनाम.

(स्वाक्षरी)

ग्राम कृषि संजीवनी समिती अध्यक्ष /समिती सदस्य यांची स्वाक्षरी

(नाव..................)